# <u>नवी मुंबई महानगरपालिका</u>
## <u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>

महानगरपालिकेच्या शुक्रवार, दिनांक 17/03/2017 रोजी भरलेल्या माहे मार्च महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| **विषय क्र. 02.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | प्रश्नोत्तरे |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 03.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2016-2017 चा सुधारीत आणि सन 2017-2018 चा अर्थसंकल्प "अ" आणि "क." |
| **ठराव क्र. 1539.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "नवी मुंबई महानगरपालिकेचा सन 2017-2018 चा अर्थसंकल्प "अ" आणि "क" यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणाऱ्या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 04.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2016-2017 चा सुधारीत आणि सन 2017-2018 चा अर्थसंकल्प "ब." |
| **ठराव क्र. 1540.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रमाचा सन 2017-2018 चा अर्थसंकल्प "ब" यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणाऱ्या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 05.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्षप्राधिकरणाचा सन 2016-2017 चा सुधारीत आणि सन 2017-2018 चा अर्थसंकल्प. |
| **ठराव क्र. 1541.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरणाचा सन 2017-2018 चा अर्थसंकल्प यावरील विचार तहकूब करण्यांत यावा आणि मा. महापौर निश्चित करतील त्या दिवशी भरणाऱ्या महानगरपालिकेच्या विशेष सभेत विचारात घेण्यांत यावा." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 06.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | प्रभाग समिती गठित करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 20/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/परि-1/आस्था-5/338/2017. |
| **ठराव क्र. 1542.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 29 (अ) अन्वये, आयुक्तांच्या उपरोक्त पत्रामध्ये तपशीलवार नमूद केलेल्या निवडणूक प्रभाग क्षेत्रापुरते मर्यादित प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह "अ", "ब", "क", "ड", "इ", "फ", "जी", "एच" याप्रमाणे 8 प्रभाग समित्या स्थापन करण्यात याव्यात." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 07.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | वाशी विभागातील वाशीगांव येथे उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, स्ट्रॉम वॉटर ड्रेन बांधणे, रस्त्याची व पदपथाची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./207/2017. |
| **ठराव क्र. 1543.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "वाशी विभागातील वाशीगांव येथे उर्वरित ठिकाणी मलनि:स्सारण वाहिन्या टाकणे, स्ट्रॉम वॉटर ड्रेन बांधणे, रस्त्याची व पदपथाची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 47 लाख, 01 हजार, 563 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 08.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | बेलापूर विभागातील नेरूळ से.48 येथील डी.ए.व्ही. शाळा परिसरातील अंतर्गत रस्त्यावर पदपथ व पावसाळी पाण्याच्या गटारांची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 13/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.(बे)/216/2017. |
| **ठराव क्र. 1544.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "बेलापूर विभागातील नेरूळ से.48 येथील डी.ए.व्ही. शाळा परिसरातील अंतर्गत रस्त्यावर पदपथ व पावसाळी पाण्याच्या गटारांची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 3 कोटी, 45 लाख, 23 हजार, 605 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 09.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे विभागातील सानपाडा से. 6, 10, 11 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.(तु)/242/2017. |
| **ठराव क्र. 1545.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे विभागातील सानपाडा से. 6, 10, 11 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथाची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 3 कोटी, 29 लाख, 67 हजार, 495 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 10.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे से. 26 येथे एसकॉन रेसिडेंन्सी, लक्ष्मी पार्वती व श्रीजी आर्केड येथे पावसाळी ड्रेन, पदपथ व रस्ता बांधण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 18/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.(तु)/243/2017. |
| **ठराव क्र. 1546.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे से. 26 येथे एसकॉन रेसिडेंन्सी, लक्ष्मी पार्वती व श्रीजी आर्केड येथे पावसाळी ड्रेन, पदपथ व रस्ता बांधण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 48 लाख, 99 हजार, 376 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. 11.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सेक्टर-21 येथे नवीन दिवाबत्तीची सोय करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 20/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ/256/2017. |
| **ठराव क्र. 1547.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सेक्टर-21 येथे नवीन दिवाबत्तीची सोय करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 52 लाख, 32 हजार, 233 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. 12.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे सेक्टर-19 येथील मध्यवर्ती स्मशानभुमीमध्ये डिझेल शवदाहिनीचे पी एन जी शवदाहिनीमध्ये रुपांतर करण्याच्य प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 22/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.(तु)/266/2017. |
| **ठराव क्र. 1548.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे सेक्टर-19 येथील मध्यवर्ती स्मशानभुमीमध्ये डिझेल शवदाहिनीचे पी एन जी शवदाहिनीमध्ये रुपांतर करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 31 लाख, 87 हजार, 381 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |
| **विषय क्र. 13.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सिडकोकडून हस्तांतरीत झालेल्या पामबीच रस्त्यावर नवीन दिवाबत्तीची सोय करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 22/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./267/2017. |
| **ठराव क्र. 1549.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "घणसोली विभाग कार्यक्षेत्रातील सिडकोकडून हस्तांतरीत झालेल्या पामबीच रस्त्यावर नवीन दिवाबत्तीची सोय करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 23 लाख, 12 हजार, 139 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **मंजूर** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 14.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे विभागातील सानपाडा येथील खोकड तलावाचे सुशोभिकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 02/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.(तु)/300/2017. |
| **ठराव क्र. 1550.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे विभागातील सानपाडा येथील खोकड तलावाचे सुशोभिकरण करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 61 लाख, 53 हजार, 773 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 15.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | घणसोली विभागातील संभाजीनगर येथील परिसरात मलनि:स्सारण वाहीनी टाकण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./340/2017. |
| **ठराव क्र. 1551.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "घणसोली विभागातील संभाजीनगर येथील परिसरात मलनि:स्सारण वाहिनी टाकण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 31 लाख, 38 हजार, 732 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 16.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार विभागीय चौकशीअंती श्री. जी.व्ही. राव, सहशहर अभियंता(विदयुत) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम- 56(2)(ग) नुसार पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे सेवेतून काढून टाकणे ही शास्ती देणेच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 07/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/प्रशा/अस्था-6/व्र.क्र.फ-565/1066/2017. |
| **ठराव क्र. 1552.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियमानुसार विभागीय चौकशीअंती श्री. जी. व्ही. राव, सहशहर अभियंता(विदयुत) यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम- 56(2)(ग) नुसार पुढे नोकरी मिळण्यास अपात्र होणार नाही अशा प्रकारे सेवेतून काढून टाकणे ही शास्ती देणेबाबत, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, सुचविल्याप्रमाणे, मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>नामंजूर</u>** |
| **विषय क्र. 17.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे सेक्टर 22 येथील श्री रामतनुमाता माता-बाल रुग्णालयाच्या इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श. अ./343/2017. |
| **ठराव क्र. 1553.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे सेक्टर 22 येथील श्री रामतनुमाता माता-बाल रुग्णालयाच्या इमारतीची दुरुस्ती व नुतनीकरण करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 1 कोटी, 96 लाख, 50 हजार, 590 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. 18.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | तुर्भे विभागातील सानपाडा से. 30 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथची सुधारणा करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 08/03/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श. अ./350/2017. |
| **ठराव क्र. 1554.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "तुर्भे विभागातील सानपाडा से. 30 येथे रस्ता, पावसाळी ड्रेन व पदपथची सुधारणा करण्याच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 3 कोटी, 7 लाख, 49 हजार, 756 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |
| **विषय क्र. 19.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | ऐरोली प्रभाग क्र. 7 चिंचपाडा येथे घनकचरा, सांडपाणी व इतर टाकाऊ वस्तुंच्या वापरातून सामुहिक बायोगॅस युनिट बांधण्याच्या (खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम 2015-2016) प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 09/02/2017 चे पत्र क्र. नमुंमपा/श.अ./203/2017. |
| **ठराव क्र. 1555.**<br>**दिनांक 17 मार्च 2017** | "ऐरोली प्रभाग क्र. 7 चिंचपाडा येथे घनकचरा, सांडपाणी व इतर टाकाऊ वस्तुंच्या वापरातून सामुहिक बायोगॅस युनिट बांधण्याच्या (खासदारांच्या स्थानिक विकास कार्यक्रम 2015-2016) कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह बाब क्र. 1, 2 व 3 मध्ये नमुद केल्यानुसार, एकूण रक्कम रु. 1 कोटी, 56 लाख, 64 हजार, 360 मात्र इतक्या खर्चापैकी बाब क्र. 1 व 2 वगळून उर्वरित रक्कम रु. 24 लाख, 38 हजार, 382 मात्र इतकी रक्कम महापालिकेच्या निधीतून खर्च करण्यास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजुरी देण्यात यावी." |
| **निर्णय -** | **<u>मंजूर</u>** |

**<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>**

**माहे मार्च 2017 ची सर्वसाधारण सभा**

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** मा. आयुक्त, तुकाराम मुंढे सो। आल्यापासून जे डेपोटेशन अधिकारी आलेले आहेत, परंतू अद्याप कोणाचीही सभागृहात मंजूरी घेतलेली नाही अशा सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ त्यांच्या मुळ विभागात तात्काळ पाठविण्याबाबत कार्यवाही करावी, तसेच मा. आयुक्त तुकाराम मुंडे हयांनी आल्या दिवसापासून जी काही चुकीची कामे केलेली आहेत त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिकेची बदनामी झालेली आहे म्हणजेच त्या बदनामीचा ठपका ठेऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करणे. | 20<br>मार्च | 1556<br>17/03/2017 | मंजूर |
| 2. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** मा. आयुक्त, तुकाराम मुंढे सो। आल्यापासून ज्या अधिकाऱ्यांचे डिमोशन केलेले आहे व अधिकाऱ्यांना सुड बुध्दिने निलंबित केलेले आहेत अशा सर्व अधिकाऱ्यांना तात्काळ हजर करुन घेण्याचे आदेश देण्यात यावे, तसेच ज्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे एक दिवसाचे विना पगारी वेतन कपात केलेले आहे अशा सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांचा कपात केलेले वेतन हया महिन्यात देण्यात यावे, तसेच आरोग्य विभागातील स्टाफ नर्स, डॉक्टर्स आणि इतर कर्मचारी हयांना ते ज्या दिवसापासून काम करीत आहेत अशा अधिकारी कर्मचाऱ्यांना प्राधान्य देण्याची तरतूद करणे. | 21<br>मार्च | 1557<br>17/03/2017 | मंजूर |
| 3. | **श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-** प्र. क्र. 12, से. 2 मधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानातील समाज मंदिर हे अतिशय नादुरुस्त झालेले असून तेथील समाज मंदिर तात्काळ दुरुस्त करुन सुभद्राआई बहूउददेशिय सेवाभावी संस्थेच्या नावाने महिला उद्योगासाठी देणे. | 22<br>मार्च | 1558<br>17/03/2017 | मंजूर |
| 4. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-** "प्र. क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथील रिलायन्स फ्रेश मॉलच्या अंतर्गत रस्त्यावर डांबरीकरण करणे तसेच तुटलेले फुटपाथ दुरुस्ती करुन नवीन लिकर कोटींग पेव्हर ब्लॉक बसविणे. | 23<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 5. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 55, सेक्टर 11 कोपरखैरणे येथे हसनमियाँ पटेल चौक ते रिलायन्स फ्रेश पर्यंत, तसेच हसनमियाँ पटेल चौक ते आझाद मैदान पर्यंत तसेच हसनमियाँ पटेल चौक ते अय्यपा मंदिर पर्यंत दोन्ही बाजूने लोखंडी रेलिंग बसविणे. | 24<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 6. | **श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 55, सेक्टर 12ई कोपरखैरणे, येथील कृष्णा अपार्टमेंट ते जमुन अपार्टमेंट पर्यंत तसेच बाबा कुंज बिल्डिंग ते एकता अपार्टमेंट पर्यंत नवीन RCC गटर बांधण्यात यावेत व नवीन लिकर कोटींग पेव्हर ब्लॉक बसविणे. | 25<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 7. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, जुईनगर अंतर्गत ज्या इमारतींना बांधकाम परवानगी असून भोगवटा प्रमाणपत्र नाही. पण त्या इमारतींचा उपभोग नागरीक दहा वर्षापेक्षा जास्त कालावधीत घेत आहेत. अशा नोंदणीकृत सोसायट्यांना वाजवी शुल्क आकारून विना अट भोगवटा प्रमाणपत्र देणे | 26<br>मार्च | 1559<br>17/03/2017 | मंजूर |
| 8. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, येथील नागरिकांच्या मागणीनुसार अहिल्याबाई होळकर पुतळा व जयभिमस्तंभ प्रभागात उभारणे. | 27<br>मार्च | 1560<br>17/03/2017 | मंजूर |
| 9. | **श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 83, जुईनगर अंतर्गत येणाऱ्या जुईपाडा गावात काही ठिकाणी नवीन पथदिवे टाकण्याची गरज आहे. तसेच काही पथदिवे स्थलांतरीत करणे गरजेचे आहे. पथदिव्यांची तक्रार करताना त्यांचे नंबर सांगण्यासाठी सर्व पथदिव्यांच्या खांबावर नंबर टाकावेत. तरी पाहणी करून सदर बाबतीत त्वरीत कार्यवाही करणे. | 28<br>मार्च | 1561<br>17/03/2017 | मंजूर |
| 10. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 45 मधील से. 3 येथील सामना मित्र मंडळाच्या कार्यालयासमोर हायमास्ट बसविणे. | 29<br>मार्च | 1562<br>17/03/2017 | मंजूर |
| 11. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 45 मधील से. 6 येथे मुख्य रस्ता रोहीत मसालाच्या बाजूला "कै. आ. अण्णासाहेब पाटील यांच्या नांवे प्रवेशद्वार बनविणे. | 30<br>मार्च | 1563<br>17/03/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 12. | **श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 45 मधील से.3, 6, 7मधील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | 31<br>मार्च | 1564<br>17/03/2017 | मंजूर |
| 13. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 96 नेरूळ, सेक्टर-16A येथील शाळा क्रमांक 8 व 9 मधील मैदानात शाळेतील निरनिराळ्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी स्टेज व मंडप उभारणे | 32<br>मार्च | 1565<br>17/03/2017 | मंजूर |
| 14. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 96 नेरूळ, सेक्टर-16 येथील भूखंड क्रमांक-122 वर स्थानिक युवकांसाठी व्यायाम शाळा बांधणे. | 33<br>मार्च | 1566<br>17/03/2017 | मंजूर |
| 15. | **श्रीम. रूपाली किस्मत भगत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 96 नेरूळ, सेक्टर 16A, 16 व 18 येथे ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी वर्गासाठी निवारा शेड उभारणे. | 34<br>मार्च | 1567<br>17/03/2017 | मंजूर |
| 16. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 14, ऐरोली, सेक्टर 20, शनिमंदिरासमोरील प्लॉट नं. 43, 34 वर जेष्ठ नागरीकांसाठी विरंगुळा केंद्र बांधणे. | 35<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 17. | **श्री. आकाश बाळकृष्ण मढवी, यांजकडून :-**<br>"प्र. क्र. 14, ऐरोली, से 20 मॅराथॉन सोसायटीच्या बाजूला चौकामधील जुने मोडलेले वाचनालय हटवून त्याठिकाणी पाण्याचा धबधबा (Water Fall) तयार करून चौकाचे सुशोभिकरण करणे. | 36<br>मार्च | 17/03/2017 | मंजूर |
| 18. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथे मुकूंद कंपनी ते आनंदनगर मुख्य रस्त्यावर पदपथ बांधून लोखंडी रॅलींग बसविणे. | 37<br>मार्च | 1568<br>17/03/2017 | मंजूर |
| 19. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथील ठाणे-बेलापूर रोड मुख्य रस्त्यावर नागरिकांना रस्ता ओलांडणेकरिता पादचारी पुल (स्कायवॉक) बांधणे. | 38<br>मार्च | 1569<br>17/03/2017 | मंजूर |
| 20. | **श्रीम. उज्वला विकास झंजाड, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 01, ईश्वरनगर येथे नवीन 15 स्ट्रीटलाईट पोल बसविणे. | 39<br>मार्च | 1570<br>17/03/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 21. | **ीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 53, नोड 1, जुहूगांव से.12 येथील स्मशानभूमीमध्ये पी.एन.जी. शवदाहिणी बसविणे. | 40<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 22. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 53, नोड 1, जुहूगांव येथे असलेल्या स्मशानभूमीचे शेड व पत्रे खराब झाल्याने स्मशानभूमीची सुधारणा करणे. | 41<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 23. | **श्रीम. प्रज्ञा प्रभाकर भोईर, यांजकडून :-** प्र. क्र. 53, नोड 1, जुहूगांव से.11 देवी ज्योती हॉटेल ते तलावापर्यंतच्या पदपथाची सुधारणा करणे. | 42<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 24. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्र. क्र. 82, जुईनगर भुखंड क्र. 1, सेक्टर-24, येथील उद्यानासाठी राखीव असलेल्या भुखंडाचे आरक्षण बदलून त्याऐवजी मैदानासाठी आरक्षित करणे | 43<br>मार्च | 1571<br>17/03/2017 | मंजूर |
| 25. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्र. क्र. 82, जुईनगर येथे नागरिकांसाठी ई-टॉयलेट बसविणे. | 44<br>मार्च | 1572<br>17/03/2017 | मंजूर |
| 26. | **श्री. विशाल पोपट ससाणे, यांजकडून :-** प्र. क्र. 82, मधील से.25 येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानामध्ये अत्याधुनिक प्रकारचे साऊंड स्पीकर तसेच सी.सी.टी.व्ही कॅमेरे लावणे. | 45<br>मार्च | 1573<br>17/03/2017 | मंजूर |
| 27. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** "केंद्र शासनाने अपंग शब्दाऐवजी दिव्यांग शब्दाचा वापर करण्यांकरिता शासन आदेश काढून अंमलबजावणीकरिता सर्वांना प्रस्तावित केलेला आहे. त्याअनुषंगाने महापालिकेच्या अपंग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्राचे नाव बदलून दिव्यांग शिक्षण, प्रशिक्षण व सेवासुविधा केंद्र करणे. | 46<br>मार्च | 1573<br>17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 28. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-** "नवी मुंबई महानगरपालिकेच्या माध्यमातून सिडकोद्वारा बांधण्यात आलेल्या इमारती ज्यांना 25 वर्षाहून अधिक किंवा धोकादायक झालेल्या इमारतीना 2.5 एफ.एस.आय राज्य शासनाच्या माध्यमातून मंजूरी देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर नवी मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील खाजगी सोसायटी व प्लॉट धारकांना सुध्दा 2.5 एफ.एस.आय मिळावा याकरिता प्रस्ताव तयार करुन राज्यशासनाच्या मान्यतेकरिता पाठविण्यात यावे, जेणेकरुन खाजगी सोसायटी व प्लॅट धारकांना सुध्दा 2.5 एफ.एस.आय प्राप्त करता येईल, | 47<br>मार्च | 1573<br>17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 29. | **श्रीम. दिव्या वैभव गायकवाड, यांजकडून :-**<br>"प्रभाग क्र. 64, सेक्टर-6, वाशी येथुन सायन-पनवेल हायवे ओलांडून वाशीगांव बस स्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर खुप अपघात झालेले आहेत व बहूतांश वेळा सिग्नल बंद असल्याकारणाने नागरिकांना सायन-पनवेल हायवे ओलांडण्याकरिता मोठी कसरत करावी लागते व कित्येक वेळा अपघाताला सामोरे जावे लागते, तरी वाशी, सेक्टर-6, येथुन सायन-पनवेल हायवे ते वाशीगांव बस स्थानकापर्यत फुट ओव्हर ब्रीज (FOB) बांधण्यात | 48<br>मार्च | 1573<br>17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 30. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 54 मधील वाशी सेक्टर 28 व 29 मधून वाहणारा उघडा नाला हा नागरी वस्तीतुन वाहणारा एकमेव नाला आहे. नाल्याच्या दोन्ही बाजूस रस्ता आहे. सदर रस्त्यावरील वाहतूक प्रचंड प्रमाणात वाढली असून कोपरखैरणे कडून पामबीच मार्गाला जाण्यासाठी, टीटीसी रबाळे येथे जाण्यासाठी, एपीएमसी मार्केट मध्ये जाण्यासाठी सदर नाल्याच्या बाजूकडील रस्ता अरुंद असल्याने वाहनांची प्रचंड कोंडी गेल्या वर्षभरात दिसुन येत आहे. उघडया नाल्यामुळे डास व इतर घाणीचा प्रार्दुभाव जाणवतोच, पंरतू आता त्यात वाहन कोंडीमुळे होणाऱ्या प्रदुषणाची भर झाली आहे. सदर नाला बंदिस्त करुन त्या नाल्यावरील मधला रस्ता दोन्ही बाजूकडील वाहतूकीस वापरल्यास वाहतूक कोंडी कमी होईल तसेच नाल्यामुळे होणारी रोगराई व दुर्गंधीस आळा बसेल, नाल्यावरील रस्ता मुख्य वाहतूकीस तर दोन्ही बाजूकडील सध्या असलेला रस्ता सर्विस रोड म्हणून वापरता येईल, तरी सदर नाल्यावर रस्ता बांधण्याची अतिशय गरज असल्याने या बाबतची योग्य ती कार्यवाही व्हावी. | 49<br>मार्च | 1574<br>17/03/2017 | मंजूर |
| 31. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 54, वाशी, सेक्टर 29 मधील डायमंड गृहनिर्माण संस्था ते सीटी कॉर्नर 1 च्या पाठीमागील बाजूस 500 मीटर x 20 मीटरचा ट्रीबेल्ट असून, ट्रीबेल्ट लगत असणाऱ्या नाल्या मधून सतत सोसासटीमध्ये येणाऱ्या विषारी सापांचा व भुरटया चोरांचा प्रार्दुभाव वाढल्याने तेथील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण तयार झालेले आहे, हा त्रास कमी होण्यासाठी, नाला व ट्रीबेल्ट च्या मधून 20 X 500 मीटर लांबीची व 6 फुट उंचीची भिंत बांधणे. | 50<br>मार्च | 1575<br>17/03/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 32. | **श्री. शशिकांत हंबीरराव राऊत, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 54, सेक्टर 28 व 29, वाशी मधील सर्व अंतर्गत रस्ते अतिवृष्टीमुळे उंच सखल झाले असून रस्त्यावर बरेच खडडे आहेत, बऱ्याच ठिकाणी रस्त्यावरील डांबर वाहून गेल्याने रस्ते निट दुरुस्त झाले नसल्याने संपूर्ण रस्त्याची पाहणी करुन योग्य ती दुरुस्ती व डांबरीकरण तातडीने करणे. | 51<br>मार्च | 1576<br>17/03/2017 | मंजूर |
| 33. | **श्री. निवृत्ती शंकर जगताप, यांजकडून :-**<br>नवी मुंबई महानगरपालिकेत सन 2007 सालापासून ठोक रक्कम करारावर अंदाजे 2500 (दोन हजार पाचशे) कामगार वेगवेगळया विभागात काम करीत आहेत, त्यात प्रामुख्याने अभियांत्रिकी विभाग, आरोग्य विभाग (सार्वजनिक रुग्णालय वाशी), स्थानिक कर संस्था, कर आकारणी, मालमत्ता कर विभाग, कर आकारणी, घनकचरा व्यावस्थापन, परवाना, उद्यान, समाज विकास, लेखा विभाग, लेखा परिक्षण विभाग, शिक्षण, परिवहन, अतिक्रमण, अन्य विभागांत कामगार काम करित आहेत. उदा. जे.ई, क्लार्क, डॉक्टर, नर्स, असे एकूण किती कामगार काम करित आहेत, सध्या त्यांना मिळत असलेल्या पगारात त्यांच्या कुंटुबाचे पालन पोषण होवू शकत नाही, तरी त्यांना कायम स्वरुपी कामावर घेवून त्यांच्या पगारात शासनाच्या धोरणानुसार वाढ करणे. | 52<br>मार्च | 1577<br>17/03/2017 | मंजूर |
| 34. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर :-**<br>प्र. क्र. 48, पावणे येथील बगीचा व मैदान मध्ये ओपन जिम (व्यायामशाळा) निर्माण करणे. | 53<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 35. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर :-**<br>प्र. क्र. 48, श्रमिकनगर येथील मैदानामध्ये ओपन जिम व्यायाम शाळा निर्माण करणे. | 54<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| 36. | **श्रीम. मनिषा शशिकांत भोईर :-**<br>प्र. क्र. 48, पावणेगांव येथील M.S.E.B चे अर्धवट अवस्थेमधील विद्युत वाहिन्या भुमिगत करण्याची कामे पुर्ण करणे. | 55<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| **37.** | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार :-**<br>प्र. क्र. 89 मधील मलनि:स्सारण वाहिन्या मोठया व्यासाच्या करणे. | 56<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **38.** | **श्री. ज्ञानेश्वर नारायण सुतार :-**<br>प्र. क्र. 89 मधील शिरवणे गावातील घरांच्या गल्लींना कॉंक्रिटीकरण करणे. | 57<br>मार्च | 17/03/2017 | सभागृहात उपस्थित नसल्यामुळे बारगळला |
| **39.** | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>मनपाकडून स्वच्छता अभियानांतर्गत झोपडपट्टी विभागात प्रत्येक घरात शौचालय बांधण्यासाठी अनुदान स्वरुपात निधी व तांत्रिक सहाय्य देताना संबंधित झोपडीधारकाकडून सुरक्षा अनामत व रस्ता दुरुस्ती आकार रक्कमेची आकारणी न करता झोपडीच्या शौचालयाची मलनि:स्सारण वाहिनी मुख्य मलनि:स्सारण वाहिनीला जोडून देण्यात येते. परंतू त्या शौचालयासाठी लागणाऱ्या पाण्याच्या वैयक्तिक जलवाहिनीच्या तरतूदी-साठी झोपडीधारकाकडून महापालिका सुरक्षा अनामत व रस्ता दुरुस्ती आकार रक्कमेची वसुली करते. सदरचा प्रकार हा विसंगत व गरीब झोपडीधारकांवर अन्याय करण्यासारखा असल्याने जे झोपडीधारक घरांमध्ये शौचालय बांधणार आहेत अशा झोपडीधारकास वैयक्तिक पाणी पुरवठयाच्या जलवाहिनीची जोडणी देताना सुरक्षा अनामत व रस्ता दुरुस्ती आकार रक्कम भरण्यातून सुट सवलत माफी देण्याची तरतूद करणे. | 58<br>मार्च | 1578<br>17/03/2017 | मंजूर |
| **40.** | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>नवी मुंबई शहर व आसपासच्या विभागातील सर्व सामान्य जनतेकडून ऐरोलीमध्ये रोजगार व दैनंदिन कामाकरिता जाण्या-येण्यासाठी ठाणे-बेलापूर मार्गावरील रबाले पोलिस स्थानकासमोरील बाजूच्या रस्त्याचा वापर केला जातो. परंतू सदरच्या रस्त्यावर पदपथाची तरतूद नसल्याने जनतेला उतरणीवरील वेगाने जाणाऱ्या भरधाव वाहनांपासून जीव वाचवुन धोका पत्करुन मार्गक्रमण करावे लागते, तरी या ठिकाणी असलेल्या जलवाहिनीच्या बाजूने पादचाऱ्यांसाठी सुरक्षित पदपथाची उभारणी करणे. | 59<br>मार्च | 1579<br>17/03/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 41. | **श्रीम. उषा कृष्णा पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 33 क्षेत्रातील सेक्टर मधील प्लॉट क्र. 214 या उद्यानासाठीच्या आरक्षित असलेल्या भुखंडावर सुंदर सुशोभित उद्यानाच्या उभारणीसह त्या उद्यानाच्या एका बाजूला महिला वर्गासाठी बंदिस्त योगाभ्यास व्यायामशाळा उभारणे आणि युवकांसाठी खुल्या व्यायाम साहित्याची उभारणी करणे. | 60<br>मार्च | 1580<br>17/03/2017 | मंजूर |
| 42. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 103 मध्ये सेक्टर 8 आर्टीस्ट व्हीलेज येथील कंडोमिनियम 1 ते 12 व इतर भुखंडाच्या क्षेत्राबाहेरील सार्वजनिक रस्त्यांची व पदपथांची दुरावस्था झालेली असल्याने त्यांची तातडीने दुरुस्ती तसेच पुर्नबांधणी करणे. | 61<br>मार्च | 1581<br>17/03/2017 | मंजूर |
| 43. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 103 मध्ये सेक्टर 8 आर्टीस्ट व्हीलेज येथील सिडकोने नियोजन आराखडयात कंडोमिनियमच्या क्षेत्राबाहेर उद्यान, हरीत पट्टा स्वरुपात राखीव ठेवलेल्या जागांवर सुशोभिकरणासह या ठिकाणीच्या वापर मुक्त स्वरुपात असलेल्या सार्वजनिक मोकळया जमिनिच्या भागांवर स्थानिक नागरिकांसाठी वाहन तळाची उभारणी करणे. | 62<br>मार्च | 1582<br>17/03/2017 | मंजूर |
| 44. | **श्रीम. सुरेखा अशोक नरबागे, यांजकडून :-**<br>ठाणे पंचायत समिती व ठाणे जिल्हा परिषदेकडून सन 1990 मध्ये सि.बी.डी.तील भारती विद्यापीठालगत बांधलेल्या व्यायाम शाळेच्या वास्तूचा वापर सि.बी.डी.तील युवकांकडून करण्यात येत होता. परंतू आजच्या घडीला मनपाच्या अधिकारातील सार्वजनिक जागेवर असलेल्या सदरील व्यायामशाळेच्या वास्तूची दुरावस्था झाल्यामुळे नागरिक व्यायामापासून वंचित राहिलेले आहेत. तरी येथील जुन्या दुरावस्थेतील व्यायामशाळेच्या वास्तूच्या ठिकाणी नवी अद्यावत अशी बहूमजली साधन सामुग्रीसह अशा व्यायाम शाळेच्या इमारतीची उभारणी करणे. | 63<br>मार्च | 1583<br>17/03/2017 | मंजूर |
| 45. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 92 येथे सिवुड दारावे हे ऐत्याहासिक रेल्वे स्थानक तयार होत आहे. त्या स्थानकासमोर पुर्वेस राणी लक्ष्मीबाई (नेरुळ सेक्टर 21, 23 येथे) चौक आहे. ज्या प्रमाणे वाशी येथे शिवाजी चौकात शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा आहे त्याच प्रमाणे नेरुळ सेक्टर 21,23 येथे असलेल्या चौकामध्ये राणी लक्ष्मीबाई यांचा अश्वारुढ पुतळा बसविणे. | 64<br>मार्च | 1584<br>17/03/2017 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 46. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 92 नेरुळ सेक्टर 21 येथील अंतर्गत आर. सी. सी. गटारे ही सिडको कालावधीतील असुन नादुरुस्त झालेली आहेत त्या सर्व गटारांची पुर्ण बांधणी करणे. | 65<br>मार्च | 1585<br>17/03/2017 | मंजूर |
| 47. | **श्री. सुनिल बाळाराम पाटील, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 92 दारावे येथे अंकुश भोईर ते सदानंद म्हात्रे यांच्या घरापर्यंत एक फूट व्यासाची मलनि:स्सारण वाहिनी टाकणे. | 66<br>मार्च | 1586<br>17/03/2017 | मंजूर |
| 48. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 108 येथे सिवुड दारावे सेक्टर 48 ते पनवेल करीता नविन बस सुविधा सुरु करणे. | 67<br>मार्च | 1587<br>17/03/2017 | मंजूर |
| 49. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 108 येथे सिवुड दारावे सेक्टर 48 येथील डी.ए.व्ही. शाळेसमोरिल मार्ग शाळा सुरु होण्याच्या तसेच सूटण्याच्या कालावधीत वन वे करणे. | 68<br>मार्च | 1588<br>17/03/2017 | मंजूर |
| 50. | **श्री. विशाल राजन डोळस, यांजकडून :-**<br>प्र. क्र. 108 येथे सेक्टर 50 जुने जूही लॉन समोरिल रस्त्यावर हायमास्ट बसविणे. | 69<br>मार्च | 1589<br>17/03/2017 | मंजूर |

सही/-

**महापालिका सचिव**

**नवी मुंबई महानगरपालिका**